राज्यातील नगर परिषदा / नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२१.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ
ई-मेलद्वारे

क्र. रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.५/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १५ नोव्हेंबर, २०२१.

प्रति,
जिल्हाधिकारी,
कोल्हापूर, चंद्रपूर, सांगली, औरंगाबाद, नागपूर व यवतमाळ.

**विषयः-** राज्यातील नगर परिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम-२०२१.

**संदर्भ :-** आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.१/का-८, दि.०९/११/२०२१ रोजीचे आदेश.

**महोदय,**

कोल्हापूर जिल्ह्यातील **शिरोळ**, चंद्रपूर जिल्ह्यातील **नागभिड**, सांगली जिल्ह्यातील **जत**, औरंगाबाद जिल्ह्यातील **सिल्लोड** व **फुलंब्री**, नागपूर जिल्ह्यातील वानाडोंगरी तसेच **यवतमाळ** जिल्ह्यातील **ढाणकी** या नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील ९ रिक्त सदस्यांची पदे रिक्त झाल्याच्या सूचना संबंधित जिल्हाधिकारी/मुख्याधिकारी यांच्याकडून राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या आहेत.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | नगरपरिषदा / नगरपंचायतींचे नाव | प्रभाग/जागा क्रमांक | पद रिक्त होण्याचे कारण | पद रिक्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | शिरोळ | ६-अ | अनर्ह | ०९/०१/२०२० |
| २ | चंद्रपूर | नागभीड | ४-अ | अनर्ह | ०९/०७/२०२० |
| ३ | सांगली | जत | ५-ब | निधन | ३१/०८/२०२० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | औरंगाबाद | सिल्लोड | १२-अ | निधन | ०३/११/२०२० |
| ५ | औरंगाबाद | फुलंब्री | २ | अनर्ह | ३१/१२/२०१९ |
| ६ | औरंगाबाद | फुलंब्री | ८ | अनर्ह | ३१/१२/२०१९ |
| ७ | नागपूर | वानाडोंगरी | ६-अ | निधन | १५/०७/२०२० |
| ८ | यवतमाळ | ढाणकी | १२ | अनर्ह | २८/०७/२०२१ |
| ९ | यवतमाळ | ढाणकी | १३ | अनर्ह | २८/०७/२०२१ |

२. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ९८०/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४/०३/२०२१ रोजीचा निर्णय आणि उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने दि.०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्र.६/२०२१ प्रख्यापित केला असून सदर आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ च्या पोट-कलम (२) मधील खंड (ड) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात आला. “(ड) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तीसाठी राखून ठेवावयाच्या जागा, नगरपरिषदेतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण, नगरपरिषदेतील एकूण जागांच्या ५० टक्यांपेक्षा अधिक असणार नाही, अशी तरतूद केली आहे.”

फुलंब्री नगरपंचायतीमध्ये एकूण १७ जागा असल्याने त्याचे २७% हे ४.५९ इतक्या जागा येतात. अध्यादेशामध्ये २७ टक्क्यांपर्यंत अशी तरतूद असल्याने २७ टक्याच्या वर आरक्षण देता येणार नाही, म्हणजेच ४.५९ करिता जास्तीत जास्त फक्त ४ जागा ना.मा.प्र. साठी देता येतील. तथापि, फुलंब्री नगरपंचायतीमध्ये आरक्षणाच्या एकूण जागा ७ असून त्यापैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या ५ जागा राखीव आहेत. तसेच उपरोक्त नमूद प्रभाग क्र. २ मधील रिक्त पद हे ना.मा.प्र. (महिला) करिता राखीव आहे. आता शासनाकडून अध्यादेश क्र.६/२०२१ दि.०१/१०/२०२१ पारित झालेला असल्यामुळे ना.मा.प्र. ची जागा ही या पोटनिवडणुकीमध्ये थेट सर्वसाधारण (महिला) करिता नेमून देण्यात यावी.

३. आयोगाने राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांकरिता यापूर्वी दि.०२/०२/२०२१, दि.०८/०२/२०२१, दि.२६/०२/२०२१, दि.३०/०३/२०२१ व दि.१८/०६/२०२१ रोजींच्या पत्रांन्वये सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आलेला होता. मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांनुसार प्रभाग निहाय मतदार यादी तयार करण्यात आली. तथापि, राज्य शासनाचे दि.०४/०३/२०२१ व ११/०८/२०२१ रोजीचे ब्रेक द चेन मधील निवडणूकविषयक निर्बंधामुळे प्रत्यक्ष निवडणूक प्रकिया पूर्ण झाली नाही. तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोव्हीड-१९) महामारी सुरु असल्याने उपरोक्त नमूद मतदार यादी कार्यक्रमानुसार मतदार याद्या अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आलेल्या नाहीत. सबब यापूर्वी दिलेले उपरोक्त नमूद सर्व मतदार यादी कार्यक्रम रद्द करण्यात येत आहेत.

४. या नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

५. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती :-**

राज्य निवडणूक आयोगाने दि.०९/११/२०२१ च्या अधिसूचनेन्वये दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२१ ही Cut-off date जाहीर केली असून, त्या दिवशी (**म्हणूजेच दि.०१ नोव्हेंबर, २०२१ रोजी**) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी या पोटनिवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

६. वरील मतदार यादी ग्राह्य धरुन उपरोक्त नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या उपरोक्त नमूद रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी मतदार यादी कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : दि. १८/११/२०२१ |
| ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना मागविणे | : दि. १८/११/२०२१ ते दि. २२/११/२०२१ पर्यंत |
| iii) | प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | : दि. २३/११/२०२१ |
| iv) | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | : दि. २५/११/२०२१ |
| v) | प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अधिप्रमाणित करुन अंतिमरित्या प्रसिध्द करणे | : दि.२६/११/२०२१ |

७. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

७.१ सध्या विधानसभेच्या मतदार यादीचा डेटा राज्य निवडणूक आयोगास प्राप्त न झाल्यामुळे महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने मतदार यादीचे विभाजन होऊ शकत नाही. त्यामुळे नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सदर पोटनिवडणुकांसाठी मतदार यादीचे पारंपारीक पध्दतीने विभाजन करण्यात यावे.

७.२ **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-**

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित नगर परिषदा/नगर पंचायतींच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि नगर परिषदा/नगरपंचायतींसाठी तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे. म्हणजेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधीत प्रभागातील सर्व मतदार, प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अथवा प्रभागाच्या हद्दीबाहेरील मतदार, त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत याची खात्री करावी.

ब) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/ प्र.क्र.६/का-५, दि.२४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी. तसेच दुबार नावांसमोर विधानसभा निवडणुकांप्रमाणे विशिष्ट चिन्हे करुन अशा मतदारांच्या ओळखीचे पुरावे काटेकोरपणे तपासावेत.

क) मयत अथवा स्थलांतरित मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्र.-रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ड) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इत्यादीबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

८. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दि.१८/११/२०२१ संबंधित मुख्याधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी द्यावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

९. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन संबंधीत मुख्याधिकारी यांनी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

९.१ संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दि.१८/११/२०२१ ते दि.२२/११/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल.

(i) लेखनिकांच्या काही चुका.

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले.

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही, नगर परिषदा/नगर पंचायतींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

९.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

१०. संबंधीत मुख्याधिकारी यांनी अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना दि.२६/११/२०२१ रोजी विहित तारखेस प्रसिध्द करावी. (परिच्छेद ११ प्रमाणे)

११. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस मुख्याधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(i) नगर परिषदेचे/नगर पंचायतीचे मुख्य कार्यालय, प्रभाग समितीचे कार्यालय व इतर कार्यालयातील सूचनाफलक.

(ii) स्थानिक वृत्तपत्र

(iii) नगर परिषद / नगर पंचायतींच्या तहसील कार्यालयाचे सूचना फलक.

(iv) स्थानिक केबल टि.व्ही.

(v) जिल्हाधिकारी व नगर परिषदा/नगर पंचायती यांचे संकेतस्थळ, इत्यादी.

१२. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर एखाद्या नगर परिषदेच्या / नगर पंचायतीच्या रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीबाबत न्यायालयाचे / शासनाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास सदर मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१३. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांची राहील.

१४. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोव्हीड-१९) महामारी सुरु असल्याने केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करुन नमूद नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी **मतदार यादी कार्यक्रम-२०२१** राबवतेवेळी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्यात याव्यात.

१५. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभाग.
६. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
७. संबंधित नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
८. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१०. निवड नस्ती (का-६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

RNI No. MAHBIL/2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ४६] मंगळवार, नोव्हेंबर ९, २०२१/कार्तिक १८, शके १९४३ [ पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१

**माहे डिसेंबर, २०२१ ते जानेवारी, २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकांसाठी दिनांक १ नोव्हेंबर २०२१ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी गाह्य धरण्याबाबत.**

**आदेश**

क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. १/का. ८.—मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९(१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ५९) मधील कलम ७(अ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १ नोव्हेंबर २०२१ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, माहे डिसेंबर, २०२१ ते जानेवारी, २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**किरण कुरुंदकर,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD,